Light of Life Trust

# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

अंक २४ वा | जानेवारी २०२४

## आमचे ध्येय

**अनेक पिढ्यांपासून चालत आलेले दारिद्र्य-चक्र तोडून एकेक व्यक्तीला सक्षम बनविणे**

गेल्या अठरा वर्षांपेक्षा जास्त कालावधीत आम्ही ५,४८,०३९ हून अधिक ग्रामीण भारतीयांचे जीवन प्रभावित करण्यात यशस्वी ठरलो आहोत. संस्थेच्या आनंदो व जागृती प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही शिक्षण, समुदाय विकास, कौशल्य विकास, आरोग्यसेवा आणि पर्यावरण संवर्धन असे विविध उपक्रम राबवीत आहोत.

## विश्वस्त मंडळ

- **श्रीमती विली डॉक्टर** – संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त
- **श्रीमती गायत्री रुईया** – विश्वस्त
- **श्री. जितेंद्र मेहता** – विश्वस्त
- **श्री. पुनीत बी. आनंद** – विश्वस्त
- **श्री. अश्दीन डॉक्टर** – विश्वस्त

## जावेद अली, लाईव्ह इन कॉन्सर्ट



दिनांक ३ नोव्हेंबर २०२३ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने मुंबईच्या एन.सी.पी.ए. येथील टाटा थिएटर मध्ये जावेद अली, लाईव्ह इन कॉन्सर्ट या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनंत प्रकल्पाच्या विद्यार्थ्यांचे समूह गीत गायन हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. त्यानंतर अष्टपैलू संगीतकार जावेद अली यांचे अप्रतिम सादरीकरण झाले.

सन्माननीय अथिती एचडीएफसी बँकेचे माजी सीईओ श्री आदित्य पुरी आणि त्यांची पत्नी यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कार्याला पाठिंबा दर्शविला. तसेच, मेंडोसा फाउंडेशन व लॉरेन्स अँड मेयोचे श्री. विवेक आणि डॉ. सुहानी मेंडोन्सा, कपाडिया असोसिएट्सचे आर्किटेक्ट किरण कपाडिया आणि फिजिओ रिहॅबच्या डॉ. अंजना लॉन्गानी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.










Title Sponsor
PHOENIX PALLADIUM

Supporting Partners
IndianOil XP95 | Union Bank of India | Bank of India | Mendonsa Foundation, Lawrence & Mayo | New India Assurance | Central Bank of India | HARIOM | Parsi Dairy Farm | B&K Securities | VIP Clothing Ltd.

Media Partners
selvel | R. | Navabharat

Radio Partners
Radio City 91.1 FM

Print Partner
JAK Printers Pvt. Ltd.

Wellness Partners
MUKTAA WELLNESS | Physio Rehab

## आमच्या लाभार्थ्यांची अभिमानास्पद कामगिरी




आनंदो प्लसचे विद्यार्थी, **श्री. नयन लोभी,** मोहिली सेंटर, कर्जत आणि **श्रीम. दीपाली क्षीसागर,** कोंढीवडे केंद्र, कर्जत यांनी आयटीएम विद्यापीठ, पनवेल येथून बी.एस्सी. ऑप्टोमेट्री यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. श्री. नयन लोबी यांनी लेन्सकार्ट, ठाणे येथे काम करण्यास सुरुवात केली आहे आणि श्रीम. दीपाली क्षीरसागर आता व्ही.ए. मयेकर ऑप्टिशियन, पनवेल येथे ऑप्टिशियन आहेत.



रिक्षा, ट्रक चालकांच्या, इयत्ता आठवी ते दहावीच्या, ६०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या पाल्यांसाठी, श्रीराम ऑटोमॉल इंडिया लिमिटेड यांच्यातर्फे दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला जाहीर करताना अभिमान वाटतो की, यावर्षी जनता विद्यामंदिर प्रशाला, दहिवली, कर्जत तहसील येथील इयत्ता अकरावीतील दीपा रेवाळे आणि इयत्ता नववीतील समेक मारुती शिंदे यांना त्यांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल श्रीराम ऑटोमॉल इंडिया लिमिटेड कडून प्रमाणपत्र आणि शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे.

## 'रस्त्यावरील छळ' या विषयावरील चार्सत्र



दिनांक ८ ऑक्टोबर २०२३ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने रेड डॉट फाउंडेशनच्या सहकार्याने, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, खालापूर, जिल्हा रायगड येथील विद्यार्थ्यांसाठी 'रस्त्यावरील छळ' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते. गुड टच, बॅड टच, लैंगिक छळ, शारीरिक छळ, ऑनलाइन छळ आणि सायबर बुलिंग या विषयांवर रेड डॉट फाउंडेशनच्या श्रीम. प्रगती यांनी चर्चा केली.

## राष्ट्रीय गणित दिन साजरा झाला



दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी, प्रसिद्ध भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या स्मरणार्थ लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सर्व आनंदो केंद्रांमध्ये राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, भाषणे, अध्यापन सहाय्य तयार करणे, प्रदर्शन आणि श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनावरील चित्रपटाचे प्रदर्शन असे विविध उपक्रम या प्रसंगी राबविण्यात आले. गणितातील हुशार विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात आल्या.

## जागतिक दृष्टी दिन साजरा झाला



दिनांक १२ ऑक्टोबर २०२३ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आणि एस बी आय फाउंडेशनच्या संजीवनी – क्लिनिक ऑन व्हील्स, ता. मुरबाड यांनी, लक्ष्य आय हॉस्पिटल, बदलापूर यांच्या सहकार्याने धसई गावातील १३८ लाभार्थ्यांसाठी दुरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून जागतिक दृष्टी दिन साजरा केला.

त्याच दिवशी लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट – सी.एच.आय. फिरता दवाखाना, कर्जत यांनी नायर सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या सहकार्याने हेदवली, कुंडलज, पोसरी–तिवरे, वदप आणि अरवंद येथील रायगड जिल्हा परिषद शाळांमधील २४३ लाभार्थ्यांसाठी अशाच प्रकारचा कार्यक्रम आयोजित केला होता. डॉ. घुटे – ज्युनियर कन्सल्टंट आणि श्रीमती शुभांगी पाटील– वरिष्ठ ऑप्टोमेट्रिस्ट, नायर सुपर स्पेशालिटी नेत्र रुग्णालय, नवीन पनवेल यांनी डोळ्यांचे आजार आणि डोळ्यांची काळजी याविषयी जनजागृती सत्र आयोजित केले होते.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे पहिले प्रांतीय अधिवेशन (आनंदो प्लस टास्क फोर्स अधिवेशन)

दिनांक २५ व २६ नोव्हेंबर २०२३ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने प्रथमच आपल्या आनंदो प्लस टास्क फोर्स सदस्यांचे दोन दिवसीय निवासी अधिवेशन, डॉ. एन.वाय. तासगावकर तंत्रशिक्षण परिसर, चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथे आयोजित केले होते. 'टास्क फोर्स मजबूत करणे आणि टास्क फोर्सचा प्रभाव सुनिश्चित करणे' हा या अधिवेशनाचा मुख्य विषय होता.

संमेलनाचे उद्घाटन लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापिका व व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर यांनी केले.

या अधिवेशनात रायगड जिल्ह्यातील (कर्जत, अलिबाग, माणगाव, खालापूर), मुंबई (वरळी) आणि नंदुरबार जिल्ह्यातील (तळोदा, धडगाव, अक्कलकुवा) एकूण ३५१ सदस्य सहभागी होते. हा कार्यक्रम संपूर्णपणे आनंदो प्लस टास्क फोर्स सदस्यांनी आयोजित केला होता. टास्क फोर्स सदस्यांमध्ये संस्थेबद्दल आपलेपणाची भावना वाढवणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमात टास्क फोर्स सदस्यांच्या भूमिका आणि कर्तव्ये याविषयांवर सादरीकरण, त्याचप्रमाणे टास्क फोर्स सुरु झाल्यापासूनचा प्रवास, डिस्प्ले कॉर्नर यांचा समावेश होता. या प्रसंगी टास्क फोर्स सदस्यांनी इतर उपस्थित सदस्यांसाठी सांस्कृतिक आणि सामाजिक जागरूकता उपक्रम सादर केले.








## उपजीविका व कौशल्य विकास केंद, शिवार जिल्हा अकोला येथे नवीन कोर्सेस ची सुरुवात



दिनांक १७ ऑक्टोबर २०२३ पासून, जागृती प्रकल्पाच्या शिवार, अकोला येथील उपजीविका आणि कौशल्य विकास केंद्रात २० विद्यार्थ्यांसह वेल्डिंगचा नवीन प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यात आला.

त्याचप्रमाणे, दिनांक ८ नोव्हेंबर २०२३ पासून १० लाभार्थ्यांच्या पहिल्या वर्गाने केक मेकिंग कोर्सचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. लाभार्थ्यांना लघु-उद्योगाच्या संधी यशस्वीरित्या मिळवून देण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरेल.



यावेळेस पहिल्या बॅचच्या लाभार्थ्यांना स्टार्टर किट्सचे वाटप करण्यात आले.

## उरणमधील आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमाचा विस्तार

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट सोबत भागीदारीत, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्याच्या ३ शाळांमध्ये आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रम सुरू केला आहे. ३५० विद्यार्थी आणि २१ शिक्षकांना त्याचा लाभ मिळाला आहे.



## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडकडून पुरस्कार प्रदान

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी अमरावती येथे वार्षिक प्रादेशिक बैठक आयोजित केली होती. या कार्यक्रमात अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यातील त्यांच्या संगणक संस्थांचे प्रतिनिधित्व करत ७०० व्यक्तींनी सहभाग घेतला. अकोला जिल्ह्यातील शिवार येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या उपजीविका व कौशल्य विकास केंद्र यांनी, एमकेसीएलच्या अपील अधिकारी (आरटीआय अंतर्गत) व व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती वीणा कामत यांच्याकडून प्लेसमेंट सर्व्हिसेसमधील सर्वोत्कृष्ट संस्थेचा पुरस्कार स्वीकारला.




## पर्यावरण संवर्धन कार्यक्रमा अंतर्गत एकूण ५७० पाणीगाड्यांचे शेतकऱ्यांना वाटप

दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी कर्जतच्या तिवरे केंद्रात रोटरी क्लब ऑफ बॉम्बे हँगिंग गार्डन यांच्या सहकार्याने पर्यावरण संवर्धन कार्यक्रमासाठी ६७० पाणीगाडे मिळाले.

दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ रोजी, बिलबॉन्ग हाय इंटरनॅशनल स्कूल, जुहू येथील १६ विद्यार्थ्यांनी कर्जतच्या तिवरे केंद्रात ९७ महिला शेतकरी लाभार्थ्यांना पाणीगाडे वाटप केले.

दिनांक ३ डिसेंबर २०२३ रोजी रोटरी क्लब ऑफ बॉम्बे हँगिंग गार्डन यांच्या श्रीम. वंदना मेहता, श्री. अमरीश दफ्तरी यांच्या समवेत ३५ स्वयंसेवकांनी, ४७२ महिला शेतकरी लाभार्थींना पाणीगाडे वाटप केले. यासोबतच ७४ शेतकऱ्यांना घरगुती सौर उर्जा यंत्रणा देण्यात आली.











## मेंटोरीया यांच्या समवेत व्यवसाय मार्गदर्शन



व्यवसाय मार्गदर्शनासाठी एक अनोखे व सर्वांगीण व्यासपीठ म्हणजे मेंटोरीया हा कार्यक्रम. या अंतर्गत इयत्ता ८वी ते १२वी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उत्तम करिअर निवडीसाठी सक्षम बनविले जाते. करिअर निवडी नंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या पहिल्या नोकरी पर्यंत मेंटोरीया त्यांच्या सोबत असते. सध्या या उपक्रमांतर्गत आनंदो आणि आनंदो प्लसच्या १००० हून अधिक मुलांना मदत केली जात आहे.

## आय.टी.एम. च्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवा



आय.टी.एम. संस्थेतील पाच विद्यार्थ्यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसोबत १०० तास स्वयंसेवा केली. त्यांनी विविध उद्योग, सार्वजनिक उपक्रम आणि सरकारी योजनांमधील संभाव्य देणगीदारांची माहितीपत्रिका तयार केली. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट संस्थेचे कार्यक्रम समजून घेण्यासाठी व लाभार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी त्यांनी वरळी येथील आनंदो केंद्र आणि कफ परेड येथील उपजीविका आणि कौशल्य विकास केंद्राला भेट दिली.

## क्रिसमस बझार मध्ये लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा सहभाग

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या उपजीविका आणि कौशल्य विकास उत्पादन विभागातील महिलांनी बनवलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजन ख्रिसमसच्या काळात विविध ठिकाणी केले गेले.



**कॅथेड्रल अँड जॉन कॉनन स्कूल, फोर्ट**




**बॉम्बे जिमखाना, फोर्ट**



**वन बी.के.सी., वांद्रे पूर्व**

या प्रदर्शनाला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि जवळजवळ ४० हजार रुपये किमतीच्या उत्पादनांची विक्री झाली.

## कर्मचारी सहभाग कार्यक्रम



दिनांक ९ डिसेंबर २०२३ रोजी आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमा अंतर्गत एच.डी.एफ.सी. क्रेडिलाच्या सदस्यांनी कर्मचारी सहभाग कार्यक्रमांतर्गत जनता विद्यालय, लौजी येथील विद्यार्थ्यांना भेट दिली आणि त्यांच्याशी संवाद साधला.

## युनिव्हर्सल बिझनेस स्कूल यांच्यासोबत धोरणात्मक सहकार्य




दिनांक २० नोव्हेंबर २०२३ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने २० स्वयंसेवी संस्थांना आमंत्रित केले होते. या प्रसंगी कर्जतच्या युनिव्हर्सल बिझनेस स्कूलचे प्रा. ब्रिगेडियर जीपीएस चीमा, कार्यक्रम संचालक, अंडरग्रेजुएट प्रोग्राम, यांच्यासमवेत कर्जत आणि सलग्न परिसरातील वस्तीतील व्यक्तींच्या भल्यासाठी, उपजीविका आणि कौशल्य विकास केंद्र, तिवरे यांच्या माध्यमातून काय करता येईल यासंबंधी चर्चा केली.

युनिव्हर्सल बिझनेस स्कूलने देखील आश्वासन दिले की त्यांच्याकडील उपलब्ध संसाधनांचे योगदान देतील आणि स्वयंसेवी संस्था करत असलेल्या सर्वांचांगल्या कामात मोलाची भर घालतील. स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांनीही सामाजिक संस्थांच्या कार्याला गती मिळण्यासाठी पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले आहे.

## सहभागी संस्थांच्या सदिच्छा भेटी



संस्थेचे भागीदार व ऑटोडेस्क लिमिटेडचे प्रतिनिधी श्री. अश्विन सुब्रमण्यम यांनी दि.२८ नोव्हेंबर २०२३ रोजी कर्जतच्या पाढीरवाडी गावाला भेट दिली. रायगड जिल्हा व पर्यावरण संवर्धन कार्यक्रमा अंतर्गत त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला, शेतकर्यांच्या प्लॉटची स्वतः पाहणी केली आणि फळझाडांच्या लागवडीसाठी शेतकर्यांच्या अजून कोणत्या गरजा आहेत याची माहिती घेतली.



दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी, सहामाई कार्यक्रम व आर्थिक पुनरावलोकनासाठी श्रीम. लीना राजन, डेप्युटी नॅशनल लीड–सी.एस.आर., श्रीम सारिका हारके, डेप्युटी मॅनेजर–सी.एस.आर., श्रीम उज्वला पाटील सहाय्यक व्यवस्थ – सी.एस.आर. बजाज फिनसर्व्ह या टीमने मुंबई बी.के.सी. येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मुख्य कार्यालयाला भेट दिली.

## संपर्कासाठी पत्ता :

**मुख्य कार्यालय :**
वन बीकेसी, सी – विंग, युनिट नंबर : १११९, प्लॉट नं. : सी–६६,
जी – ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (ई),
मुंबई – ४०० ०५१ . संपर्क क्र. : +९१ २२ ६९०४ ७४७०
ईमेल : connect@lightoflifetrust.org

**शाखा कार्यालये :**
**महाराष्ट्र :** • अहमदनगर • अकोला • अलिबाग • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • वाशिम • यवतमाळ
**गुजराथ :** • कुकरमुंडा **मध्य प्रदेश :** • सिवनी
**राजस्थान :** • बिजोलिया • सिकार **ओडिशा :** • अंगुल

www.lightoflifetrust.org  +91-9820 689 131

@LightOfLifeTrustIndia  @lightoflifetrust_lolt  @lightoflifetrst  lightoflifetrust  YouTube youtube.com/c/lightoflifetrust

## माझ्या मोहिमेला पाठिंबा द्या : टाटा मुंबई मॅरेथॉन २०२४




**प्रिय हितचिंतक,**

आपण सर्वजण आनंदात असाल अशी आशा आहे. आमचा विश्वास आहे की शिक्षणाच्या क्षेत्रातील वाटचाल म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे नेणारा एक शक्तिशाली प्रवास आहे. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट मध्ये आम्हाला खात्री आहे की शिक्षण हे गरिबीचे निर्मूलन व रोजगाराच्या संधी वाढवण्याची गुरुकिल्ली आहे. आमच्या आनंदो प्रकल्पाच्या माध्यमातून आम्ही वंचित ग्रामीण मुलांना सर्वसमावेशक सहाय्य प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आमच्या सहाय्याशिवाय ही मुले शाळाबाह्य झाली असती. या मुलांचे माध्यमिक शिक्षण पूर्ण करणे इतकाच आमचा हेतू नसून त्यांचा सर्वांगीण विकास करणे हे ही आमचे ध्येय आहे. गेल्या काही वर्षांमध्ये, आमच्या अथक प्रयत्नांनी महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान आणि ओडिशा मधील १९२,००० हून अधिक मुलांच्या आयुष्यात बदल घडून आलेला आहे. या सकारात्मक परिवर्तनाचे साक्षीदार होताना आज आम्हाला खूप संतोष वाटतो. या मुलांचे पालक जिथे महिना ५००० रुपये मिळवत असत तिथे ही मुले महिना रु.१०००० ते रु.१२००० सुरुवातीलाच मिळवत आहेत. ही हृदयस्पर्शी उत्क्रांती आमच्या पालकांनी अगदी नेमक्या शब्दांत मांडली आहे –'लाईट ऑफ लाईफ – वे ऑफ लाईफ'. आमच्या या कार्यात मदत म्हणून आपल्याकडून निधी उभारण्यासाठी, तुमच्या मोलाच्या सहकार्यासाठी मी तुमच्याशी संवाद साधत आहे. ज्यांच्या कुटुंबातील पिढ्या न पिढ्या अशिक्षित आहेत अशा १००० मुलांना शिक्षणासाठी सक्षम बनवणे हे आमचे ध्येय आहे. या मुलांना शैक्षणिक संसाधने प्रदान करण्यासाठी आणि पिढ्या न पिढ्यांची गरिबीची साखळी तोडण्यासाठी आम्हाला मदत करा आणि आमच्या ध्येयाचा अविभाज्य भाग बना. तुमच्या औदार्याला सीमा नाही. तुम्ही दिलेली प्रत्येक देणगी, मग ती कितीही लहान असो वा मोठी, खरोखर एक आशीर्वाद आहे. पिढ्यानपिढ्यांची दारिद्र्य साखळी नष्ट करण्याच्या या कार्यात आपण सारे एकजुटीने भक्कमपणे उभे ठाकूया. एक एक आयुष्य उजळून आपण शिक्षणाचा प्रकाश, रोजगाराचा प्रकाश आणि अंतिमत: परिपूर्ण जीवनाचा प्रकाश पसरवू या.

प्रेमाशिर्वाद,

**विली डॉक्टर**
**संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त**
**लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट**

**पेटीएम वरून लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला देणगी देण्यासाठी**

Contribute Now ! Paytm

https://m.paytm.me/LOLT